# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द),ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२२५९००
फॅक्स क्र. ०२१३३-२३०५८३

ई मेल - gcoeara@gmail.com
वेबसाईट : www.gcoeara.ac.in


जा.क्र.शाअसंमअ / आस्था / २०१५ / 1920

दि. 01-07-2015

## निविदा सूचना

या महाविद्यालयातील मुलांची व मुलींची खानावळ सुरु करण्यासाठी अनुभवी / नामवंत आणि सक्षम अशा चालक किंवा केटरिंग कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच संस्थेतील सुरक्षा व्यवस्था व साफसफाईचे काम निविदा मागवून बाहयश्रोत्यांकडून करुन घ्यायचे आहे. त्यासाठीही नोंदणीकृ त कंत्राटदारांकडून मोहोरबंद लिफाफयात निविदा मागविण्यात येत आहेत. मुलांची खानावळ, मुलींची खानावळ, सुरक्षा कर्मचारी व सफाई कर्मचारी यातील प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्र निविदा सादर करणे आवश्यक आहे. सदर निविदेच्या अटी व शर्ती बाबतची माहिती संस्थेचे संकेतस्थळ www.gcoeara.ac.in यावर दिलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. १७.०७.२०१५ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत आहे. तरी इच्छुकांनी संकेतस्थळावरुन माहिती घेऊन निविदा सादर कराव्या.

(प्रा.एस.व्ही.जोशी)
प्र.प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन
महाविद्यालय अवसरी (खुर्द)

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द),ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२२५९०० | ई मेल - gcoeara@gmail.com
फॅक्स क्र. ०२१३३-२३०५८३ | वेबसाईट : www.gcoeara.ac.in

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी - खुर्द या संस्थेस सफाई कामगारांचा पुरवठा करणा-या कंत्राटदारांसाठी अटी, शर्ती व इतर आवश्यक माहिती-

१) कर्मचा-यांचा पुरवठा करणारे कंत्राटदार हे शासनाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

२) कंत्राटदारांनी सफाई कामगारांचे दरमहा अपेक्षीत वेतन रुपयामध्ये निविदेमधे सुस्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. विविध नियमांना अधीन राहून कंत्राटदार या नात्याने भरावे लागणारे शासकीय कर अथवा देणी याचा उल्लेख करुनच अपेक्षीत वेतन नमूद करावे. निविदेमध्ये सुस्पष्टता असली पाहीजे, कोणत्याही प्रकारची खाडाखोड, अपुर्ण उल्लेख इ. आढळल्यास निविदा नाकारली जाईल.

३) कंत्राटदारांनी संस्थेला ८ सफाई कामगार पुरविणे आवश्यक आहे. मात्र या कर्मचा-यांची प्रत्यक्ष संख्या आवश्यकतेनुसार कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील. सफाई कामगारांचा दररोजचा कामाचा कालावधी किमान ८ तासाचा राहील. ( सर्वसाधारणपणे सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.४५) आवश्यकतेनुसार त्यात बदल करण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील.

४) कंत्राटदारांनी या कर्मचा-यांचा पुरवठा दि. ०१-०८-२०१५ पासून ते दि. ३१-०७-२०१६ या एक वर्ष कालावधीसाठी करावयाचा आहे. या कालावधीमध्ये कंत्राटी पध्दतीवरील नेमणुकीबाबत शासनाचे काही वेगळे धोरण ठरल्यास कंत्राटदारांच्या नियुक्तीचा कालावधी दि. ३१-०७-२०१६ पूर्वी संपुष्टात आणण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील. त्यासाठी पूर्वसूचना देणे आवश्यक असणार नाही.

५) वरीलप्रमाणे नियुक्ती करण्यात आलेल्या सफाई कामगारांनी संस्था परिसरातील सर्व इमारतींमधील टॉयलेट ब्लॉक्स, पॅसेजेस व जिने साफसफाईचे काम करणे आवश्यक राहील. साफसफाईचे कामानंतर इतर कामासाठी पूर्णवेळ संस्थेत उपस्थित रहावे लागेल. प्राचार्यांनी वेळोवेळी आवश्यकतेनुसार नेमून दिलेली इतर कामे करणे सर्व कर्मचा-यांना बंधनकारक राहील.

६) कंत्राटदाराने पुरविलेल्या सर्व कर्मचा-यांचे एकत्रित वेतनावर शासकीय दराने आयकर कपात करुन कंत्राटदारास रक्कम अदा केली जाईल. सदरची रक्कम कंत्राटदाराच्या बँक खात्यात परस्पर जमा केली जाईल. कोणत्याही परिस्थितीत प्राचार्यांकडून परस्पर संबंधीत कर्मचा-यांना वेतन अदा केले जाणार नाही.

७) एकत्रित वेतनाची रक्कम ही दर महिन्यास महिना पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराकडून देयक प्राप्त झाल्यावर ते शासकीय कोषागारात सादर करुन कोषागाराकडून मंजूर झाल्यानंतरच अदा करण्यात येईल. या रकमेपाटी कोणतेही अग्रीम अनुज्ञेय असणार नाही व देयक प्रदानास उशीर झाल्यास कोणतेही व्याज देय राहणार नाही. तसेच कर्मचा-यांच्या अनुपस्थित दिवसांची वेतन दरानुसार कपात करण्यात येईल. काही तांत्रिक कारणाने संस्थेकडून वेतन देण्यास विलंब झाला तरी कंत्राटदाराने प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत सुरक्षा रक्षकांना वेतन अदा करणे आवश्यक राहील.

८) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना नियमीत शासकीय कर्मचा-यांप्रमाणे कोणतेही फायदे अथवा अन्य भत्ते या संस्थेकडून देय नाहीत. तसेच या कर्मचा-यांच्या नियुक्तीचा अन्य नियमीत नियुक्तीशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही.

९) सफाई कामगारांना आवश्यक ते सफाई साहित्य व उपभोग्य सामान संस्थेकडून पुरविले जाईल.

१०) कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात येणारे कर्मचारी प्रामाणिक व विश्वासू असल्याची खात्री कंत्राटदारांनी करुन अशाच कर्मचा-यांचा पुरवठा करणे आवश्यक राहील. एखाद्या कर्मचा-याचे काम समाधानकारक नसल्यास प्राचार्यांच्या सूचनेनुसार कंत्राटदारांनी त्याऐवजी दुसरा कर्मचारी लवकरात लवकर पुरविणे आवश्यक राहील. कामावर असतांना मद्यपान, अंमली पदार्थ सेवन केलयास गैरहजेरी धरली जाईल.

११) सफाई कामगारांबाबत कोणत्याही प्रकारचा दावा / अपघात नुकसान भरपाई / तक्रार इ. वाद उद्‌भवल्यास त्याची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. संस्था कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. कर्मचा-यांच्या निष्काळजीपणामुळे संस्थेच्या मालमत्तेचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई देण्याची जबाबदारी कंत्राटदारांची राहिल.

१२) सफाई कामगारांना शासनाच्या किमान वेतन कायदयानुसार वेतन देणे ही कंत्राटदारांची जबाबदारी राहील. किमान वेतन नियम १९४८, वेतन प्रदान अधिनियम १९३६, कामगार नुकसान भरपाई अधिनियम १९२३, राज्य कामगार विमा अधिनियम १९४८, भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ इ. सर्व कायद्यातील तरतूदींचे पालन करणे आणि संबंधीत कायद्यानुसार आवश्यक ती माहिती व नोंद रजिस्टर्स कंत्राटदाराकडे असणे आवश्यक आहे. तसेच सेवा कर व व्यवसाय कर कायद्याखाली कंत्राटदारांची नोंदणी आवश्यक आहे. संबंधीत कंत्राटदाराकडे कंत्राटी कामगार अधिनियम १९७० नुसार परवाना असणे आवश्यक आहे. या बाबीची नोंद घेऊनच कंत्राटदारांनी सफाई कामगार यांच्यासाठी अपेक्षीत असलेल्या दरमहा वेतनाचे दर निविदेत नमूद करावे.

१३) कंत्राटदाराने आवश्यकतेनुसार कमी अधिक प्रमाणात महिला सफाई कामगार पुरविणे आवश्यक राहील.

१४) कंत्राटदारांनी मागील महिन्याचे वेतन कर्मचा-यांना अदा केल्याचा लिखीत पुरावा संस्थेला पुढील महिन्याच्या देयकासोबत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही.

१५) कंत्राटदारांनी निविदा सादर करताना निविदेसोबत संस्थेच्या नोंदणी दाखल्याची प्रत, नोंदणीच्या अद्ययावत नुतनीकरणाच्या पुराव्याची प्रत, अशा प्रकारच्या कर्मचा-यांचा शासकीय / निमशासकीय कार्यालयांना पुरवठा करण्याचा अनुभव असल्याच्या कागदपत्रांची प्रत सादर करणे आवश्यक आहे. सर्व्हिस टॅक्स रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत, पॅन कार्ड ची प्रत, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

१६) प्रस्तुत सफाई कामगारांचे काम कंत्राटदाराने अन्य कंत्राटदारास पोट ठेक्याने देता येणार नाही. असे आढळून आल्यास सदरचक कंत्राट ताबडतोब रद्द केले जाईल.

१७) सफाई कामगारांना मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील. त्यांना मराठी भाषेत देण्यात येणा-या लेखी अथवा तोंडी सूचना समजणे आवश्यक आहेत.

१८) कंत्राटदारांना सदर करार संपुष्टात आणावयाचा असल्यास त्यांनी संस्थेला १ महिन्याची पूर्वसूचना देणे आवश्यक राहील.

१९) कंत्राटदारांनी इन्कमटॅक्स, सर्व्हिस टॅक्स, प्रोफेशन टॅक्स इ. सर्व टॅक्स भरल्याचा पुरवा प्राचार्यांनी मागीतल्यास सादर करावा लागेल.

२०) सफाई कामगारांना कामावर असताना शारीरीक दुखापत झाल्यास त्यांना वैद्यकीय सहाय्य देणे व या सहाय्यापोटी येणा-या खर्चाची व भरपाईची जबाबदारी कंत्राटदारांवर राहील.

२१) सफाई कामगारांचे हजेरी पत्रक कामाच्या ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे व त्यावर कामाच्या सुरुवातीसच हजेरी मांडणे आवश्यक आहे. प्राचार्यांना केव्हाही हजेरीपत्रक तपासण्याचा अधिकार राहील व तपासणीमधे कामगार कामावर न आढळल्यास त्यांची गैरहजेरी धरली जाईल.

२२) कंत्राटी कर्मचा-यांच्या पुरवठयाबाबत वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असतील तरच कंत्राटदारांनी निविदा भरावी. कंत्राटदारांची निविदा स्वीकृ त झाल्यास कंत्राटदारांना वरीलप्रमाण अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा रु. १००/- ( रु. शंभर फक्त ) च्या स्टँप पेपरवर नोटरीसमोर करुन द्यावा लागेल. कंत्राटदार यांची मान्य झालेली निविदा, वर्क ऑर्डर हे प्रस्तुतच्या करारनाम्याचा अविभाज्य भाग राहील. करारनामा केल्यानंतरच प्राचार्यांकडून कर्मचा-यांच्या पुरवठयाचे आदेश दिले जातील.

२३) प्राप्त झालेल्या कोणत्याही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण नमूद न करता नाकारण्याचा अधिकार प्राचार्यांना राखून ठेवला आहे.

२४) निविदा सादर करताना रु. २०००/- ( परत न मिळणारी निविदा फॉर्म फी ) संस्थेत रोखीने जमा करुन त्याची शासकीय पावती निविदेसोबत जोडावी लागेल. शासकीय पावती जोडलेली नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

01-07-2015

( प्रा. श्री.वि. जोशी )
प्र. प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (अवसरी खुर्द)

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द),ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२२५९०० ई मेल - gcoeara@gmail.com
फॅक्स क्र. ०२१३३-२३०५८३ वेबसाईट : www.gcoeara.ac.in


शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी - खुर्द या संस्थेस सुरक्षा रक्षकांचा पुरवठा करणा-या कंत्राटदारांसाठी अटी, शर्ती व इतर आवश्यक माहिती-

१) कर्मचा-यांचा पुरवठा करणारे कंत्राटदार हे शासनाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तसेच त्यांचेकडे पोलिस अधिनियम २००५ नुसार नोंदणी दाखला असणे आवश्यक आहे.

२) कंत्राटदारांनी सुरक्षा रक्षक कर्मचा-यांसाठी दरमहा अपेक्षीत वेतन रुपयामध्ये निविदेमधे सुस्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. विविध नियमांना अधीन राहून कंत्राटदार या नात्याने भरावे लागणारे शासकीय कर अथवा देणी याचा उल्लेख करुनच अपेक्षीत वेतन नमूद करावे. प्रत्येक शिफ्टचा कालावधी आठ तासांचा राहील. निविदेमध्ये सुस्पष्टता असली पाहीजे, कोणत्याही प्रकारची खाडाखोड, अपुर्ण उल्लेख इ. आढळल्यास निविदा नाकारली जाईल.

३) कंत्राटदारांनी संस्थेला प्रत्येक शिफ्टमध्ये ६ सुरक्षा रक्षक पुरविणे आवश्यक आहे. मात्र या कर्मचा-यांची प्रत्यक्ष संख्या आवश्यकतेनुसार कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील. कंत्राटदारांनी नेमलेल्या सुरक्षा रक्षकांच्या गैरहजेरीत पर्यायी रिलिव्हर सुरक्षा रक्षक तातडीने उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. साप्ताहिक सुटी अथवा इतर सुटीच्या दिवशी देखील सुरक्षा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सुरक्षा रक्षकाने आपल्या कामाची वेळ संपल्यावर पुढील शिफ्टमधील सुरक्षारक्षक कामावर आल्यानंतर त्याला चार्ज दिल्यानंतरच जावे. पुढील शिफ्टवरील रक्षक न आल्यास कामाचे ठिकाण सोडून जाऊ नये.

४) कंत्राटदारांनी या कर्मचा-यांचा पुरवठा दि. ०१-०८-२०१५ पासून ते दि. ३१-०७-२०१६ या एक वर्ष कालावधीसाठी करावयाचा आहे. या कालावधीमध्ये कंत्राटी पध्दतीवरील नेमणुकीबाबत शासनाचे काही वेगळे धोरण ठरल्यास कंत्राटदारांच्या नियुक्तीचा कालावधी दि. ३१-०७-२०१६ पूर्वी संपुष्टात आणण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील. त्यासाठी पूर्वसूचना देणे आवश्यक असणार नाही.

५) वरीलप्रमाणे नियुक्ती करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांनी परिसरातील इमारती व मालमत्ता यांची चोरी व मोडतोड होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील. असे झाल्यास होणारे नुकसान ठेकेदारांनी संस्थेस भरुन दिले पाहिजे, तसे न केल्यास संस्थेकडून कंत्राटदाराच्या देयकातून वसुली केली जाईल. प्राचार्यांनी वेळोवेळी आवश्यकतेनुसार नेमून दिलेली सुरक्षा विषयक इतर कामे करणे सर्व कर्मचा-यांना बंधनकारक राहील.

६) कंत्राटदाराने पुरविलेल्या सर्व कर्मचा-यांचे एकत्रित वेतनावर शासकीय दराने आयकर कपात करुन कंत्राटदारास रक्कम अदा केली जाईल. सदरची रक्कम कंत्राटदाराच्या बँक खात्यात परस्पर जमा केली जाईल. कोणत्याही परिस्थितीत प्राचार्यांकडून परस्पर संबंधीत कर्मचा-यांना वेतन अदा केले जाणार नाही.

७) एकत्रित वेतनाची रक्कम ही दर महिन्यास महिना पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराकडून देयक प्राप्त झाल्यावर ते शासकीय कोषागारात सादर करुन कोषागाराकडून मंजूर झाल्यानंतरच अदा करण्यात येईल. या रकमेपाटी कोणतेही अग्रीम अनुज्ञेय असणार नाही व देयक प्रदानास उशीर झाल्यास कोणतेही व्याज देय राहणार नाही. तसेच कर्मचा-यांच्या अनुपस्थित दिवसांची वेतन दरानुसार कपात करण्यात येईल. काही तांत्रिक कारणाने संस्थेकडून वेतन देण्यास विलंब झाला तरी कंत्राटदाराने प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत सुरक्षा रक्षकांना वेतन अदा करणे आवश्यक राहील.

८) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना नियमीत शासकीय कर्मचा-यांप्रमाणे कोणतेही फायदे अथवा अन्य भत्ते या संस्थेकडून देय नाहीत. तसेच या कर्मचा-यांच्या नियुक्तीचा अन्य नियमीत नियुक्तीशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही.

९) सुरक्षा रक्षकांना आवश्यक ती साधने व उपकरणे पुरवण्याची जबाबदारी कंत्राटदारांची राहील. सुरक्षा रक्षकाने स्वच्छ व निटनेटका गणवेश घालणे आवश्यक आहे. सुरक्षा रक्षकाकडे हेल्मेट, बेल्ट, कॅप, काठी, शिट्टी, ओळखपत्र, बॅटरी इ. साहित्य उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याचा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे. संस्थेकडून त्यासाठी कोणतीही रक्कम दिली जाणार नाही.

१०) कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात येणारे कर्मचारी प्रामाणिक व विश्वासू असल्याची खात्री कंत्राटदारांनी करुन अशाच कर्मचा-यांचा पुरवठा करणे आवश्यक राहील. एखाद्या कर्मचा-याचे काम समाधानकारक नसल्यास प्राचार्यांच्या सूचनेनुसार कंत्राटदारांनी त्याऐवजी दुसरा कर्मचारी लवकरात लवकर पुरविणे आवश्यक राहील. कामावर असताना मद्यपान, अंमली पदार्थ सेवन केल्यास अथवा झोपलेले आढळल्यास गैरहजेरी धरली जाईल.

११) सुरक्षा रक्षकांबाबत कोणत्याही प्रकारचा दावा / अपघात नुकसान भरपाई / तक्रार इ. वाद उद्‌भवल्यास त्याची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. संस्था कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. कर्मचा-यांच्या निष्काळजीपणामुळे संस्थेच्या मालमत्तेचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई देण्याची जबाबदारी कंत्राटदारांची राहिल.

१२) सुरक्षा रक्षकांना शासनाच्या किमान वेतन कायदयानुसार वेतन देणे ही कंत्राटदारांची जबाबदारी राहील. किमान वेतन नियम १९४८, वेतन प्रदान अधिनियम १९३६, कामगार नुकसान भरपाई अधिनियम १९२३, राज्य कामगार विमा अधिनियम १९४८, भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरी व कल्याण यांचे नियम) अधिनियम १९८१, खाजगी सुरक्षा रक्षक संस्था ( नियमन ) अधिनियम २००५ इ. सर्व कायद्यातील तरतूदींचे पालन करणे आणि संबंधीत कायद्यानुसार आवश्यक ती माहिती व नोंद रजिस्टर्स कंत्राटदाराकडे असणे आवश्यक आहे. तसेच सेवा कर व व्यवसाय कर कायद्याखाली कंत्राटदारांची नोंदणी आवश्यक आहे. संबंधीत कंत्राटदाराकडे कंत्राटी कामगार अधिनियम १९७० नुसार परवाना असणे आवश्यक आहे.

१३) कंत्राटदाराने आवश्यकतेनुसार कमी अधिक प्रमाणात महिला सुरक्षा रक्षक पुरविणे आवश्यक राहील.

१४) नेमलेल्या सुरक्षा रक्षकांची शारीरीक वैद्यकीय तपासणी वेळोवेळी करुन घेण्याची जबाबदारी कंत्राटदारांची राहील.

१५) कंत्राटदारांनी मागील महिन्याचे वेतन कर्मचा-यांना अदा केल्याचा लिखीत पुरावा संस्थेला पुढील महिन्याच्या देयकांसोबत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही.

१६) कंत्राटदारांनी निविदा सादर करताना निविदेसोबत संस्थेच्या नोंदणी दाखल्याची प्रत, नोंदणीच्या अद्ययावत नुतनीकरणाच्या पुराव्याची प्रत, अशा प्रकारच्या कर्मचा-यांचा शासकीय / निमशासकीय कार्यालयांना पुरवठा करण्याचा अनुभव असल्याच्या कागदपत्रांची प्रत सादर करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र खाजगी सुरक्षारक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ च्या अंतर्गत योजना २००२ च्या खंड १३ (२) व खंड १४ (३) नुसार नियोक्ता अभिकरण म्हणून नियोक्ता अभिकरणाच्या नोंदवहीत समावेश केल्याचे सूचना पत्राची प्रत, पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ पुणे यांच्याकडील नोंदणीची प्रत, मा. पोलिस आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडील नोंदणीची प्रत, सर्व्हिस टॅक्स रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत, पॅन कार्ड ची प्रत, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

१७) प्रस्तुत सुरक्षा व्यवस्थेचे काम कंत्राटदाराने अन्य कंत्राटदारास पोट ठेक्याने देता येणार नाही. असे आढळून आल्यास सदरचक कंत्राट ताबडतोब रद्द केले जाईल.

१८) सुरक्षा रक्षकांना मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील. त्यांना मराठी भाषेत देण्यात येणा-या लेखी अथवा तोंडी सूचना समजणे आवश्यक आहेत.

१९) कंत्राटदारांना सदर करार संपुष्टात आणावयाचा असल्यास त्यांनी संस्थेला १ महिन्याची पूर्वसूचना देणे आवश्यक राहील.

२०) कंत्राटदारांनी इन्कमटॅक्स, सर्व्हिस टॅक्स, प्रोफेशन टॅक्स इ. सर्व टॅक्स भरल्याचा पुरवा प्राचार्यांनी मागीतल्यास सादर करावा लागेल.

२१) सुरक्षा रक्षकांच्या कामावर कंत्राटदारांनी नेमलेल्या पर्यवेक्षकाची देखरेख व नियंत्रण असणे आवश्यक आहे. सदर पर्यवेक्षकाने आपल्या पर्यवेक्षणाचा अहवाल वेळोवेळी प्राचार्यांना सादर करावा लागेल.

२२) सुरक्षा रक्षकांच्या कामावर असताना शारीरीक दुखापत झाल्यास त्यांना वैद्यकीय सहाय्य देणे व या सहाय्यापोटी येणा-या खर्चाची व भरपाईची जबाबदारी कंत्राटदारांवर राहील.

२३) सुरक्षा रक्षकांचे हजेरी पत्रक कामाच्या ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे व त्यावर कामाच्या सुरुवातीसच हजेरी मांडणे आवश्यक आहे. प्राचार्यांना केव्हाही हजेरीपत्रक तपासण्याचा अधिकार राहील व तपासणीमधे कामगार कामावर न आढळल्यास त्यांची गैरहजेरी धरली जाईल.

२४) कंत्राटी कर्मचा-यांच्या पुरवठयाबाबत वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असतील तरच कंत्राटदारांनी निविदा भरावी. कंत्राटदारांची निविदा स्वीकृ त झाल्यास कंत्राटदारांना वरीलप्रमाण अटी व शर्ती मान्य असल्याचा

करारनामा रु. १००/- ( रु. शंभर फक्त ) च्या स्टँप पेपरवर नोटरीसमोर करुन द्यावा लागेल. कंत्राटदार यांची मान्य झालेली निविदा, वर्क ऑर्डर हे प्रस्तुतच्या करारनाम्याचा अविभाज्य भाग राहील. करारनामा केल्यानंतरच प्राचार्यांकडून कर्मचा-यांच्या पुरवठयाचे आदेश दिले जातील.

२५) प्राप्त झालेल्या कोणत्याही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण नमूद न करता नाकारण्याचा अधिकार प्राचार्यांनी राखून ठेवला आहे.

२६) निविदा सादर करताना रु. २०००/- ( परत न मिळणारी निविदा फॉर्म फी ) संस्थेत रोखीने जमा करुन त्याची शासकीय पावती निविदेसोबत जोडावी लागेल. शासकीय पावती जोडलेली नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

01-07-2015

( प्रा. श्री.वि. जोशी )
प्र. प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (अवसरी खुर्द)

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द),ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२२५९०० ई मेल - gcoeara@gmail.com

फॅक्स क्र. ०२१३३-२३०५८३ वेबसाईट : www.gcoeara.ac.in


## मुलींच्या वसतीगृहातील खानावळीसाठी निविदा अर्ज

### अ ) अर्जदाराबाबतची व्यवसायासंबंधी माहिती

अर्जदाराचे संपूर्ण नाव - ..............................................

१) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता- ..............................................

.............................. पिन कोड ................

२) शैक्षणिक पात्रता- ..............................................

३) अ- खानावळ चालविण्याचा अनुभव आहे काय ? होय / नाही

ब- असल्यास कोणत्या संस्थेच्या खानावळीचा ..............................

अनुभव आहे त्याचे नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक ..............................

क- खानावळ चालवण्याच्या अनुभवाचे प्रमाणपत्र होय / नाही
( कालावधी व खानावळीच्या क्षमतेचा उल्लेख
असावा) सादर केले आहे काय ?

ड- ग्रामीण आरोग्य विभागाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

इ - अन्न व औषध प्रशासनाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

४) अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारची तक्रार / खटला पोलीस आहे / नाही
ठाण्यात प्रलंबीत आहे का ?
असल्यास तपशील दयावा.

( या व्यतिरीक्त अनुभवासंदर्भात माहिती द्यावयाची असल्यास वेगळया पानावर नमुद करावी)

## ब ) निविदा अर्ज

१ ) मुलींचे दरमहा जेवणाचा दर ( सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे ) रु. . . . . . . . . . . . . . . .
दोन्ही वेळेला पोटभर जेवण देणे अनिवार्य आहे.

२) अ) एका महिन्याचे किमान ५ पेक्षा जास्त खाडे . . . . . . . . . . . . . . .
मान्य असल्यास ती संख्या

ब) एकवेळच्या खाडयाचा दर रु. . . . . . . . . . . . . . .

३) एका वेळेचा गेस्ट चार्ज (पाहुणे असल्यास) रु. . . . . . . . . . . . . . . .
(पाहुणे म्हणजे संस्थेच्या वसतीगृहात प्रशिक्षणासाठी आलेले व तात्पुरत्या निवासासाठी असलेले विद्यार्थी, वसतीगृहात शासकीय कामाने वास्तव्यात असलेले अधिकारी / कर्मचारी अथवा संस्थेचे अधिकारी / कर्मचारी )

४) नाष्टयाचा मेनू व दर (नाष्टा घेणे ऐच्छीक) रु. . . . . . . . . . . . . . . .

५) चहाचा दर ( चहा घेणे ऐच्छीक ) रु. . . . . . . . . . . . . . . .

मी खालील सही करणार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की, वरीलप्रमाणे निविदा अर्जात माझ्याबद्दल दिलेली माहिती खरी आहे. जर माहिती खोटी आढळल्यास करार रद्द करण्यात यावा. तसेच मी दिलेले दर मंजूर झाल्यास संस्थाप्रमुखांच्या पूर्वपरवानगी शिवाय हया दरामध्ये कोणताही बदल करणार नाही. हया निविदा अर्जाच्या सोबतच्या अटी व शर्ती मला प्राप्त झाल्या असून त्याचे मला आकलन झालेले आहे.

मला संस्थेच्या मुलींच्या वसतीगृहासाठी असलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असून त्याचे अधिन राहून मी वरील दरपत्रक सादर करीत आहे.

अर्जदाराची सही

(अर्जदाराचे नाव - )

अर्जदाराचा संपूर्ण पत्ता (दूरध्वनी क्रमांकासह) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)
## मुलींच्या वसतीगृहातील खानावळ : अटी व शर्ती

१. मुलींच्या खानावळीमध्ये महिला कर्मचारीच नेमणे आवश्यक राहील. फक्त अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्येच प्राचार्य व रेक्टर यांच्या पूर्वपरवानगीने या अटीमधून सूट देण्याचा विचार करता येईल.

२. वसतीगृहातील दोन्ही वेळेला जेवण घेण्या-या मुलींची अंदाजे संख्या २२० ते २३० असेल, व चहा व नाष्टा घेणे ऐच्छीक राहील.

३. खानावळ चालकांकडे ग्रामीण आरोग्य विभागाचा दाखला, अन्न व औषध प्रशासनाचा दाखला इ. कागदपत्रे असणे अनिवार्य आहेत. त्याची प्रत निविदेसोबत जोडावी.

४. स्वयंपाकासाठीचे स्वयंपाकघर,पाणी कनेक्शन, गॅस कनेक्शनसाठीचे पाईपिंग, स्वयंपाकाची व जेवणासाठी आवश्यक भांडी संस्था पुरवेल. त्याचे भाडे रु. ६०००/- दरमहा करार सुरु झाल्यापासून करार संपेपर्यंत (सुटीचे दिवस धरुन ) खानावळ चालकांनी भरणे आवश्यक आहे.

५. तेल, गहू, तांदूळ, डाळी, कडधान्य, भाज्या इ. जेवणाचे घटक पदार्थ चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक राहील.

६. दररोजच्या जेवणामध्ये सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे मेनू देणे आवश्यक आहे. मेनूमध्ये काही कारणाने बदल अपरिहार्य असल्यास होस्टेल रेक्टरना त्याची पूर्वसूचना द्यावी लागेल.

७. दरमहा ५ जेवणाचे खाडे ( गैरहजेरी) गृहीत धरण्यात येतील.

८. कंत्राटदाराने ओला व सुका कचरा इ.ची विल्हेवाट स्वतःची स्वतः करणे आवश्यक राहील. तसेच कच-याच्या दुर्गंधीपासून आरोग्यास धोका निर्माण होणार नाही याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

९. संस्थेच्या अधिकृत विद्यार्थीनीशिवाय बाहेरील व्यक्तींना खानावळीत प्रवेश देवू नये अथवा त्यांना डबा देण्याची सुध्दा परवानगी नाही.(विद्यार्थीनीचे पालक किंवा नातेवाईक असल्यास रेक्टर यांच्या परवानगीनंतर गेस्ट चार्ज आकारुन देणे)

१०. रु. १,५०,०००/- ( रु. एक लाख पन्नास हजार फक्त ) अनामत रक्कम संस्थेत जमा करुनच करार अस्तित्वात येईल.

११. कराराची मुदत एक वर्ष असेल. तथापी खानावळीच्या त्या वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन करून पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना आहेत. कराराची मुदत संपल्यानंतर सर्व साहित्य संस्थेकडे जमा करण्यात यावे. त्यानंतरच कंत्राटदारांची अनामत रक्कम परत केली जाईल.

१२. कंत्राटदारांनी करार व अटीचे मान्यतेचे करारपत्र रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करावे लागेल. खानावळीचे कामकाजाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करुन सदर करार तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील.

१३. मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांचे सुचनेनुसार खानावळीची आकस्मिक तपासणी वेळोवेळी करण्यांत येईल. कंत्राटदाराने तपासणीच्यावेळी सहकार्य करावे.

१४. खानावळीमध्ये मद्यपान / धुम्रपान / अंमली पदार्थांचे सेवन व विक्री करण्यास सक्त मनाई आहे.

१५. खानावळीतील अन्नाचा दर्जा आरोग्यास हितकारक असावा. खानावळीतील अन्नापासून विद्यार्थीनींना अथवा इतरांना कोणत्याही प्रकारची बाधा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी खानावळ चालकावर राहील.

१६. कोणतेही कारण न देता सदर निविदा प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार संस्थेकडे राखीव आहेत.

१७. पॅनकार्डची झेरॉक्स प्रत निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

१८. खानावळीमध्ये कोणत्याही कर्मचा-यास राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

१९. खानावळीमध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या आरोग्याचा वैद्यकीय दाखला घेवून त्यांची संपूर्ण माहिती संस्थेस द्यावी लागेल.

२०. सेवा कर (Service Tax) नोंदणीचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

२१. खानावळीच्या जागेचा वापर दुस-या कोणत्याही व्यवसायासाठी करता येणार नाही. तसे आढळून आल्यास करार तत्काळ रद्द केला जाईल.

२२. विद्यार्थीनींच्या परीक्षेच्या पूर्वतयारी कालावधीदरम्यान व परीक्षेच्या कालावधीमधे खानावळीच्या मासिक दराची आकारणी प्राचार्यांच्या सूचनेनुसार करावी लागेल.

२३. विद्यार्थीनींकडून जेवणाच्या मासिक दराच्या वसूलीची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील.

२४. खानावळीची वेळ प्राचार्य, रेक्टर व विद्यार्थीनींच्या चर्चेनुसार ठरविली जाईल.

२५. निविदा सादर करताना रु.२०००/- ( परत न मिळणारी निविदा फॉर्म फी ) संस्थेत रोखीने जमा करुन त्याची शासकीय पावती निविदेसोबत जोडावी. शासकीय पावती जोडलेली नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

( प्रा. श्री.वि. जोशी )
प्र. प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (अवसरी खुर्द)

# मुलींचे वसतिगृह मेनू कार्ड २०१५-१६

| सकाळ | | | | | संध्याकाळ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वार | सुकी भाजी | पातळ भाजी | वरण भात | सलाड | सुकी भाजी | पातळ भाजी | गोड | वरण भात | सलाड |
| सोम | मेथी (कुट टाकून) | चवळी | तूर | काकडी/ टोमॅटो | पिवळा बटाटा | मटार पनीर | श्रीखंड | दाल तडका आणि जीरा राईस | कोशिंबीर /मठ्ठा, पापड, भजी (कांदा/ पालक) |
| | | | | | पनीर भुर्जी | व्हेज कोल्हापुरी | गुलाबजामून | | |
| | | | | | पनीर मसाला | काजू करी | बासुंदी | | |
| | | | | | बटाटा वाटणा | पनीर कोफ्ता | दही वडे | | |
| मंगळ | मसाला वांगी (कुट टाकून) | वाटणा | मुग | टोमॅटो /गाजर | मसाला भेंडी | छोले | - | तूर | गाजर/ काकडी |
| बुध | गवार/ कारले | हरभरा (मोड आलेले) | सांबर | गाजर/ काकडी | शिमला मिरची (बेसन पीठ टाकून) | मोड आलेली मटकी | - | दाल तडका आणि जीरा राईस | टोमॅटो / गाजर |
| गुरु | फ्लॉवर/ गंगाफळ | शेवभाजी | मुग | बीट/ काकडी | मिसळपाव | - | - | मसाला भात | टोमॅटो |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | साबुदाणावडा/ खिचडी (बटाटा टाकून) | दही | २ फळे (वेगवेगळी) | | पराठे (पालक/बटाटा) | दही/ खोबरा चटणी | - | | |
| | | | | | पाव भाजी | - | - | | |
| | | | | | छोले आणि भटुरे /पुरी | | शेवयांची खीर /शिरा | | |
| शुक्र | शेपू/ ऋतूनुसार पालेभाजी (कुट टाकून) | शेवगा शेंग/ चवळी शेंग | तूर | मुळा/ गाजर | टोमॅटो चटणी/ कोबी | पाटवड्या | | तूर | गाजर/ मुळा |
| शनी | लाल बटाटा | कढी | दाल तडका आणि जीरा राईस | काकडी/ मुळा | पिठलं आणि भाकरी | मसूर डाळ | | मुग | कांदा |
| रवी | मुग/ मटकी उसळ (मोड आलेली) | वरण फळ | | मसाला भात | पालक/ ऋतूनुसार पालेभाजी(कुट टाकून) | पातळ बटाटा (साल काढून) | तूर | - | मुळा/ गाजर |

**रोज सकाळ आणि संध्याकाळ :- लोणचे (कैरी / लिंबू / मिक्स)**

**रोज संध्याकाळ :- चटणी (शेंगदाणा / तीळ / जवस / काळे तीळ)**

22/06/15
Y.N. Chaudhari

**प्राचार्य**
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय
अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे.

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२२५९०० ई मेल - gcoeara@gmail.com

फॅक्स क्र. ०२१३३-२३०५८३ वेबसाईट : www.gcoeara.ac.in


### मुलांच्या वसतीगृहातील खानावळ व संस्थेसाठी उपहारगृह चालविण्यासाठी निविदा अर्ज

अ ) अर्जदाराबाबतची व्यवसायासंबंधी माहिती

अर्जदाराचे संपूर्ण नाव - ..........................................................

१) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता- ..........................................................

.................................. पिन कोड ..................

२) शैक्षणिक पात्रता- ..........................................................

३) अ- खानावळ चालविण्याचा अनुभव आहे काय ? होय / नाही

ब- असल्यास कोणत्या संस्थेच्या खानावळीचा ..........................................

अनुभव आहे त्याचे नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक ..........................................

क- खानावळ चालवण्याच्या अनुभवाचे प्रमाणपत्र ( कालावधी व खानावळीच्या क्षमतेचा उल्लेख असावा) सादर केले आहे काय ? होय / नाही

ड- ग्रामीण आरोग्य विभागाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

इ - अन्न व औषध प्रशासनाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

४) अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारची तक्रार / खटला पोलीस ठाण्यात प्रलंबीत आहे का ? आहे / नाही
असल्यास तपशील दयावा.

( या व्यतिरीक्त अनुभवासंदर्भात माहिती द्यावयाची असल्यास वेगळया पानावर नमुद करावी)

## ब ) निविदा अर्ज

१ ) मुलांच्या दरमहा जेवणाचा दर ( सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे ) रु. . . . . . . . . . . . . . . .
दोन्ही वेळेला पोटभर जेवण देणे अनिवार्य आहे.

२) अ) एका महिन्याचे किमान ५ पेक्षा जास्त खाडे . . . . . . . . . . . . . . .
मान्य असल्यास ती संख्या

ब) एकवेळच्या खाडयाचा दर रु. . . . . . . . . . . . . . .

३) एका वेळेचा गेस्ट चार्ज (पाहुणे असल्यास) रु. . . . . . . . . . . . . . . .
(पाहुणे म्हणजे संस्थेच्या वसतीगृहात प्रशिक्षणासाठी आलेले व तात्पुरत्या निवासासाठी असलेले विद्यार्थी, वसतीगृहात शासकीय कामाने वास्तव्यात असलेले अधिकारी / कर्मचारी अथवा संस्थेचे अधिकारी / कर्मचारी )

४) उपहारगृहासाठी मेनू व दर
येथे वेगवेगळया पदार्थांचा दर नमूद करावा.

मी खालील सही करणार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की, वरीलप्रमाणे निविदा अर्जात माझ्याबद्दल दिलेली माहिती खरी आहे. जर माहिती खोटी आढळल्यास करार रद्द करण्यात यावा. तसेच मी दिलेले दर मंजूर झाल्यास संस्थाप्रमुखांच्या पूर्वपरवानगी शिवाय हया दरामध्ये कोणताही बदल करणार नाही. हया निविदा अर्जाच्या सोबतच्या अटी व शर्ती मला प्राप्त झाल्या असून त्याचे मला आकलन झालेले आहे.

मला संस्थेच्या मुलांच्या वसतीगृहासाठी असलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असून त्याचे अधिन राहून मी वरील दरपत्रक सादर करीत आहे.

अर्जदाराची सही

(अर्जदाराचे नाव - )

अर्जदाराचा संपूर्ण पत्ता (दूरध्वनी क्रमांकासह) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)
## मुलांच्या वसतीगृहातील खानावळ व संस्थेसाठी उपहारगृह : अटी व शर्ती

१. मुलांच्या वसतीगृहातील खानावळीमध्ये संस्थेसाठीचे उपहारगृह देखील चालवावे लागेल. सर्वसाधारणपणे जेवण देण्याची वेळ दुपारी १२.०० ते दुपारी २.०० व सायंकाळी ७.०० ते रात्री ९.०० अशी राहील. उपहारगृहाची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी १२.०० व दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० अशी राहील. ही अट मान्य असणा-या कंत्राटदारांनीच निविदा भरावी. फक्त जेवणासाठी खानावळ चालविण्याचे कंत्राट दिले जाणार नाही. उपहारगृह व खानावळ दोन्ही एकाच कंत्राटदारांस चालवावे लागेल.
२. वसतीगृहातील दोन्ही वेळेला जेवण घेण्या-या मुलांची अंदाजे संख्या ४२५ ते ४५० असेल. उपहारगृहामध्ये संस्थेतील एकूण २००० विद्यार्थी / अधिकारी / कर्मचारी यापैकी कोणीही येऊ शकेल .
३. खानावळ चालकांकडे ग्रामीण आरोग्य विभागाचा दाखला, अन्न व औषध प्रशासनाचा दाखला इ. कागदपत्रे अनिवार्य आहेत. त्याची प्रत निविदेसोबत जोडावी.
४. स्वयंपाकासाठीचे स्वयंपाकघर,पाणी कनेक्शन, गॅस कनेक्शनसाठीचे पाईपिंग, स्वयंपाकाची व जेवणासाठी आवश्यक भांडी संस्था पुरवेल. त्याचे भाडे रु. ६०००/- दरमहा करार सुरु झाल्यापासून करार संपेपर्यंत (सुटीचे दिवस धरुन ) खानावळ चालकांनी भरणे आवश्यक आहे.
५. उपहारगृहासाठी लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ तसेच भांडी यांची सोय कंत्राटदारांनी स्वतः करावयाची आहे.
६. उपहारगृहामध्ये दूध, चहा, कॉफी, शीतपेये तसेच हलके अल्पोपहाराचे पदार्थ (पोहे, शिरा, खिचडी, इडली सांबार, डोसे, सँडवीच, नूडल्स, पॅटीस इत्यादी ) उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.
७. केंद्र शासनाच्या आरोग्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार उपहारगृहामध्ये Junk Food (Potato chips / wafers/Kurkure इत्यादी) तसेच तंबाखूजन्य पदार्थ यांची विक्री करण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हे पदार्थ विक्रीसाठी ठेवता येणार नाहीत.
८. खानावळ व उपहारगृहामध्ये उपलब्ध असणा-या सर्व अन्नपदार्थांचा दर्जा उत्कृष्ठ असावा. सर्व अन्नपदार्थ ताजे, गरम व स्वच्छ असावेत.
९. खानावळीतील कर्मचारी यांच्या स्वच्छतेचे कटाक्षाने पालन होणे अनिवार्य आहे.
१०. तेल, गहू, तांदूळ, डाळी, कडधान्य, भाज्या इ. जेवणाचे घटक पदार्थ चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक राहील.
११. दररोजच्या जेवणामध्ये सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे मेनू देणे आवश्यक आहे. मेनूमध्ये काही कारणाने बदल अपरिहार्य असल्यास होस्टेल रेक्टरना त्याची पूर्वसूचना द्यावी लागेल.
१२. दरमहा ५ जेवणाचे खाडे ( गैरहजेरी) गृहीत धरण्यात येतील.
१३. कंत्राटदाराने ओला व सुका कचरा इ.ची विल्हेवाट स्वतःची स्वतः करणे आवश्यक राहील. तसेच कचऱ्याच्या दुर्गंधीपासून आरोग्यास धोका निर्माण होणार नाही याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
१४. संस्थेच्या अधिकृत विद्यार्थ्यांशिवाय बाहेरील व्यक्तींना खानावळीत प्रवेश देवू नये अथवा त्यांना डबा देण्याची सुध्दा परवानगी नाही. (विद्यार्थ्यांचे पालक किंवा नातेवाईक असल्यास रेक्टर यांच्या परवानगीने गेस्ट चार्ज आकारुन देणे)
१५. रु. २,५०,०००/- ( रु. दोन लाख पन्नास हजार फक्त ) अनामत रक्कम संस्थेत जमा करुनच करार अस्तित्वात येईल.
१६. कराराची मुदत एक वर्ष असेल. तथापी खानावळीच्या व उपहारगृहाच्या त्या वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन करुन पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना आहेत. कराराची मुदत संपल्यानंतर सर्व साहित्य संस्थेकडे जमा करण्यात यावे. त्यानंतरच कंत्राटदारांची अनामत रक्कम परत केली जाईल.
१७. कंत्राटदारांनी करार व अटीचे मान्यतेचे करारपत्र रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करावे लागेल. खानावळीचे व उपहारगृहाचे कामकाजाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करुन सदर करार

तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील.

१८. मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांचे सुचनेनुसार खानावळीची व उपहारगृहाची आकस्मिक तपासणी वेळोवेळी करण्यांत येईल. कंत्राटदाराने तपासणीच्यावेळी सहकार्य करावे.

१९. खानावळीमध्ये मद्यपान / धुम्रपान / अंमली पदार्थांचे सेवन व विक्री करण्यास सक्त मनाई आहे.

२०. खानावळीतील अन्नाचा दर्जा आरोग्यास हितकारक असावा. खानावळीतील अन्नापासून विद्यार्थ्यांना अथवा इतरांना कोणत्याही प्रकारची बाधा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी खानावळ चालकावर राहील.

२१. कोणतेही कारण न देता सदर निविदा प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार संस्थेकडे राखीव आहेत.

२२. पॅनकार्डची झेरॉक्स प्रत निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

२३. खानावळीमध्ये कोणत्याही कर्मचा-यास राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

२४. खानावळीमध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या आरोग्याचा वैद्यकीय दाखला घेऊन त्यांची संपूर्ण माहिती संस्थेस द्यावी लागेल.

२५. सेवा कर (Service Tax) नोंदणीचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

२६. खानावळीच्या जागेचा वापर दुस-या कोणत्याही व्यवसायासाठी करता येणार नाही. तसे आढळून आल्यास करार तत्काळ रद्द केला जाईल.

२७. विद्यार्थांच्या परीक्षेच्या पूर्वतयारी कालावधीदरम्यान व परीक्षेच्या कालावधीमधे खानावळीच्या मासिक दराची आकारणी प्राचार्यांच्या सूचनेनुसार करावी लागेल.

२८. विद्यार्थ्यांकडून जेवणाच्या मासिक दराच्या वसूलीची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील. उपहारगृहामध्ये विक्री केलेल्या पदार्थांची किंमत विक्रीच्या वेळेसच घेण्याची दक्षता कंत्राटदारांनी घ्यायची आहे.

२९. उपहारगृह व खानावळीची वेळ प्राचार्य, रेक्टर व विद्यार्थ्यांच्या चर्चेनुसार बदलता येईल.

३०. निविदा सादर करताना रु.२०००/- ( परत न मिळणारी निविदा फॉर्म फी ) संस्थेत रोखीने जमा करुन त्याची शासकीय पावती निविदेसोबत जोडावी. शासकीय पावती जोडलेली नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

( प्रा. श्री.वि. जोशी )
प्र. प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (अवसरी खुर्द)

मुलांची खानावळ - * 2015-16 सत्रासाठी जुलै/ऑगस्ट पासून 'प्रकाशित' मेस साठी मेन्यू' *

| वार | सकाळ | | संध्याकाळ | | |
|---|---|---|---|---|---|
| | पातळ भाजी | सुकी भाजी | पातळ भाजी | सुकी भाजी | |
| सोमवार | मोड आलेली मटकी | गवार | मसाला वांगी | मोड आलेला मुग | |
| मंगळवार | आलू + वांगी | मोड आलेली मटकी | शेवभाजी | मसाला भेंडी | |
| बुधवार | वाटाणा | टोमॅटो चटणी | चवळी | उकडलेल्या बटाट्याचं भरीत | |
| गुरुवार | छोले / हरभरा | पिठलं / कोबी | उकडलेला बटाटा रस्सा | sweet (गुलाब जामुन, जिलेबी, बालुशाही, साफशी) | |
| शुक्रवार | झुलगा / वाग्यांची भाजी | दोडका / फरशी | पालक दाळभाजी | वाल / फ्लॉवर | |
| शनिवार | सोयाबिन / शेवगा | कापलेली भेंडी | वाटाणा | चवळी शेंग / शिमला मिरची | |
| रविवार | मसाला वांगी | कोबी / फ्लॉवर | शेवगा / शिमला | कांदा झुणका / टोमॅटो चटणी | |

Terms & conditions :- 1) दोन्ही वेळा पापड, दही, सुकी चटणी अनिवार्य राहील.
2) दोन्ही वेळा ग्रीन सॅलड (कांदा + काकडी + मुळा + गाजर + बीट + लिंबु + टोमॅटो) / कोशिंबिर अनिवार्य राहील
3) पोळी, फुलका विना तेलाची
4) दोन्ही वेळा yellow तुरीच्या दाळीचे वरण अनिवार्य राहील. 5) दोन्ही वेळा पांढरा भात अनिवार्य राहील

8/06/2015 Ankush Dange Hostel secretary

Rector

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय